पाक्षिक | वार्षिक वर्गणी रु. ३० | किंमत १ रुपया २५ पैसे
# शेतकरी संघटक
वर्ष १० वे | अंक १८ वा | ६ जानेवारी १९९४

# पाटी पुसली, आता पुढे....

**— शरद जोशी**

३० डिसेंबर १९९३ रोजी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष श्री. मधुकरराव चौधरी यांनी एक पत्र सभागृहात वाचून दाखवले. पत्रावर सर्वश्री मोरेश्वर टेमुर्डे, वसंतराव बोंडे, वामनराव चटप, शिवराज तोंडचिरकर व सौ. सरोज काशीकर या पाच आमदारांच्या सह्या होत्या. १९९० च्या निवडणुकीत शेतकरी संघटनेचे हे पाच पाईक जनता दलाच्या चिन्हावर निवडून आले होते. तेव्हापासून आतापर्यंत जनता दलाची शिस्त त्यांनी कसोशीने पाळली होती. अध्यक्षांना उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये या पाच आमदारांनी जनता दल विधानसभा पक्षापासून फारकत घेऊन सभागृहात स्वतंत्र गट म्हणून बसण्याचा आपला निर्णय जाहीर केला.

सभागृहात जनता दलाचे एकूण सदस्य चौदा, त्यापैकी पाच जणांनी म्हणजे एक ततीयांशापेक्षा जास्त सदस्यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे कायदेशीर अडचण काहीच नव्हती. अध्यक्षांनी शेतकरी संघटनेच्या आमदारांची ही विनंती मान्य केल्याचे लगेच जाहिर केले. शेतकरी आंदोलनाच्या इतिहासातील राजकीय आघडीच्या एका कालखंडावर पडदा पडला.

महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलन आता सर्व प्रस्थापित राजकीय पक्षांपासून दूर झाले आहे. काँग्रेस, भा. ज. पा., शिवसेना आणि इतर चिल्लर पक्ष यांच्याशी संघटनेची जवळीक कधीच नव्हती. दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने एकोणनव्वद साली ज्या ज्या मतदारसंघात शिवसेना-भा. ज. पा. विरुद्ध काँग्रेस असा सरळ सरळ सामना होता त्या ठिकाणी काँग्रेस उमेदवाराला सिद्धांततः, पाठिंबा संघटनेने जाहिर केला होता, एवढे सोडल्यास काँग्रेसबद्दल संघटनेने सहानुभूती अशी कधी दाखवलीच नव्हती. जातीयवादी पक्षांना सभ्य समाजात काही स्थानच असता कामा नये, अशी संघटनेची भूमिका सतत राहिल्यामुळे शिवसेना आणि भा. ज. पा. यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रश्नच कधी उद्भवला नाही.

१९८७ सालापासून शेतकरी संघटना विश्वनाथ प्रतापसिंग यांचा विकल्प उभा करण्याच्या कामास हातभार लावू लागली. ८९ सालच्या लोकसभा निवडणुकीत संघटनेने जनता दलाच्या उमेदवारांना पाठिंबा दिला. ९० सालच्या विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी निवडणुक लढविण्यासाठी अनेक मतदारसंघात जनता दलाकडे उमेदवारदेखील नव्हते, अशा परिस्थितीत संघटनेने आपले कही कार्यकर्ते

*शेतकऱ्याना लुटून देशाला कर्जाच्या खाईत लोटणारे नेहरूवादी शासन जाऊन शेतकऱ्यांच्या दृष्टीने कारभार करणारे शासन दिल्लीत सुस्थापित होईल असा आशावाद १९८९-९० मध्ये निर्माण झाला होता. त्यावेळी केंद्रातील अशा शासनाला पाठिंबा देणारी शक्ती राज्यपातळीवरही असावयास हवी या हेतूने महाराष्ट्रात तयार झालेल्या काँग्रेस व जातीयवादी पक्षांविरुद्ध उभ्या राहिलेल्या आघाडीमध्ये शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना ही आघाडी मजबूत करण्यासाठी भाग घेण्याचे आदेश संघटनेने दिले. संघटनेचा आदेश शिरसावंद्य मानून या कार्यकर्त्यांनी १९९० च्या विधानसभा निवडणुकीत भाग घेतला. त्यातील पाच जणांनी निवडणूक यशस्वीपणे जिंकून शेतकरी संघटनेचे बिनीचे कार्यकर्ते म्हणून विधानसभेचे सदस्यत्व स्वीकारले आणि सातत्याने शेतकऱ्यांची व शेतकरी महिलांची बाजू विधानसभेत मांडली. जनता दलाच्या चिन्हावर निवडून गेलेले म्हणून जनता दलाच्या गटात बसणारे हे आमदार. पण जनता दलाचे १९८९ मधले शेतकरीप्रेम हे बेगडी होते हे हळूहळू उघड होऊ लागले आणि शेवटी तर विचारांतला परस्पर विरोध स्पष्ट होऊ लागला. शेतकरी संघटनेच्या विचारांची बांधीलकी घेऊन शेतकरी संघटनेचे बिनीचे कार्यकर्ते म्हणून वसा घेतलेल्या या पाईकांना शेतकरीविरोधी मनाच्या पक्षाबरोबर बसणे किती दिवस सहन होणार. अखेर ३० डिसेंबर १९९३ रोजी या आमदारांनी शेतकरी संघटनेच्या राजकीय समितीशी विचारविनिमय करून विधानसभेत आपला वेगळा गट बनविण्याचा निर्णय जाहिर केला आणि ते घुसमटलेल्या अवस्थेतून बाहेर सुटले.*

*श्री. शरद जोशींच्या शब्दांत, 'या निर्णयाने शेतकरी आंदोलनाच्या इतिहासातील राजकीय आघाडीच्या एका कालखंडावर पडदा पडला.'*

*या घटनेचे सविस्तर विश्लेषण करणारा हा श्री. शरद जोशींचा लेख **"पाटी पुसली, आता पुढे...."***

जनता दलास उपलब्ध करून दिले. राजीव गांधींच्या काँग्रेस शासनाला सज्जड पर्याय तयार करणे आणि त्यातून कर्जमुक्ती आंदोलन पुढे रेटणे अशी संघटनेची थोडक्यात रणनीती होती.

जनता दलाच्या युतीचा अनुभव पहिल्यापासून मोठा कष्टदायी राहिला. निवडणुका तोंडावर आल्या असतांना आणि खुद्द निवडणुकांच्या रणधुमाळीत पुरोगामी लोकशाही आघाडीतील राजकीय पक्षांच्या नेत्यांनी, एवढेच नव्हे तर परवा परवा काँग्रेसमधून फुटून आलेल्या किरकोळ कार्यकर्त्यांनी संघटनेचा दुःस्वास केला. तो सहन करूनही संघटनेने जनता दलाबरोबरचे संबंध कायम राखले, राजीव गांधींना ८९ साली विश्वनाथ प्रतापसिंगांखेरीज जास्त प्रभावशाली पर्याय कोणी नाही या एकाच कारणाखातर.

शेतकरी संघटना आणि जनता दल यांचे वैचारिक एकमत कधी झालेच नाही. संघटना सर्व प्रश्न साकल्याने अभ्यासून विचाराचे एकसुती महावस्त्र घेऊन निघालेली. या उलट जनात दल म्हणजे अनेक विचारांचा आणि मतामतांचा निव्वळ गजबजाट. भिन्न भिन्न मते पुरोगामी लोकशाही आघाडीत असावीत हे साहजिकच होते. शेवटी ती एक आघाडी होती. पण, जनता दलाच्या नेत्यांत तर्कशुद्ध, वास्तवाचे भान राखणारा विचार ठेवणारा कोणीच नव्हता. प्रत्येकाची काही आवडती वाक्ये, काही लाडके छंद, त्यात पुष्कळसा राजकीय, आर्थिक लाभाचा विचार. जनता दलाच्या, चिंध्या कशाबशा शिवून तयार केलेल्या गोधडीचे संघटनेच्या महावस्त्राशी जमले असते तरच मोठे आश्चर्य.

कर्जमुक्तीच्या आंदोलनामुळे संघटनेचे हात अडकलेले होते. कर्जमुक्तीची शेतकरी संघटनेची संकल्पना दूर करून पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंग यांच्या शासनाने देवीलाल-पुरस्कृत सरसकट कर्जमाफीची महागडी आणि तत्त्वहीन योजना स्वीकारली. या निर्णयासाठी जनता दलाच्या धुरीणांचा शेतकरी संघटनेविषयीचा विद्वेष कारण होता. अर्थमंत्री मधु दंडवते यांचे पुतळे जाळण्याचा कार्यक्रम संघटनेने ला हाती घ्यावा लागला त्याच दिवशी जनता दल आणि संघटना यांच्यातील फारकतीला सुरुवात झाली.

जनता दलाचे मी मी म्हणवणारे नेते अधिकाराच्या खुर्चीसाठी पक्ष सोडून गेले. संघटनेचे आमदार कोणत्याही मोहाला बळी न पडता जनता दलातच राहिले; हरेक प्रश्नावर जनता दलाशी मतभिन्नता असून त्यांनी आपली भूमिका बदलली नाही.

'सामाजिक न्याय' अशा गोंडस घोषणेखाली जनता दलाने सरकारी नोकरीतील राखीव जागांचा प्रश्न उभा केला. संघटनेने राखीव जागांचा प्रश्न गरीबी हटविण्याशी अप्रस्तुत असा मानला आहे. सर्वांना पुरतील इतके रोजगार उपलब्ध होणे शक्य नाही त्यामुळे राखीव जागांनी मूठभर दलितांचेसुद्धा भले होणार नाही; मागासवर्गीय परंपरेने बलुतेदार आणि हुन्नरी आहेत, त्यांचा प्रश्न नोकऱ्या देऊन सुटणार नाही; स्वयंरोजगारी उद्योजकांना पोषक अशी अर्थव्यवस्था दलितांचे भले करू शकेल; सरकारी नियोजनाच्या व्यवस्थेत ब्राह्मण, इतर सवर्ण आणि 'ब्राह्मणी' दलित यांचेच काय ते भले होऊ शकेल, सर्व सामान्य दलितांचे नाही; सरकारी नोकऱ्यांतील सवर्णांची मक्तेदारी तोडण्यासाठी, सरकारी नोकरशाहीचा वरचष्मा संपवण्यासाठी राखीव जागांचा उपयोग होईल पण त्यामुळे दलितांच्या प्रश्न सुटेल ही कल्पना खोटी अशी संघटनेची राखीव जागांविषयीची भूमिका आहे. संघटना मंडलवादी नव्हती, मंडलविरोधी नव्हती, मंडलविरोधकांना विरोध करणारी होती.

जनता दलातून चौधरी देवीलाल फुटून गेले आणि भा. ज. पा. च्या राम मंदिराचा कार्यक्रम गाजू लागला, त्याला प्रत्युत्तर म्हणून विश्वनाथ प्रतापसिंग यांनी मंडल आयोगाची युगत काढली. त्यामागे अभ्यास नाही, निष्ठा नाही, दलितांविषयीची कळवळही नाही. या प्रश्नापासूनच जनता दलातील विचारांचा गोंधळ वाढत गेला. आर्थिक प्रश्नांऐवजी 'सामाजिक न्याया'चे राजकारण जनता दलाच्या अग्रणींना अधिक भावू लागले.

राष्ट्रीय कृषि नीतीचा मसुदा कृषि सल्लागार समितीने जनता दलाच्या शासनास सादर केला. खुल्या अर्थव्यवस्थेतील खुल्या शेतीचे धोरण त्यात विस्तृतपणे मांडण्यात आले होते. खुल्या बाजारपेठेवर आधारित अर्थकारणाचा हा आराखडा जनता दलाच्या शासनास मानवला नाही. त्यांनी तो बाजूस टाकला. मंडल प्रश्नावर जनता दलाने जी हिम्मत दाखवली ती शेतकऱ्यांच्या प्रश्नावर दाखविली असती तर आजपावेतो शासन जनता दलाचेच असते, जुन्या पुराण्या नेहरू – नियोजन-व्यवस्थेला मूठमाती देण्याचे श्रेय दलाला मिळाले असते आणि त्याची आर्थिक क्षेत्रातील ऐतिहासिक कामगिरी उज्ज्वल ठरली असती. जनता दलाने ही ऐतिहासिक संधी गमावली. अशी संधी गमावणाऱ्या राजकारण्यांना इतिहास कधी क्षमा करत नाही.

जनता दल सत्तेवर असतानाच देशावरील परकीय चलनाच्या चणचणीचे अरिष्ट येऊ घातले होते. संकटाचे ढग समाजवादी जनता दलाच्या काळात अधिक गडद झाले. पी. व्ही. नरसिंहराव यांचे काँग्रेस शासन शपथ ग्रहण करेपर्यंत परिस्थिती इतकी बिकट झाली होती की नेहरूपद्धतीची व्यवस्था सोडून खुल्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्यापलिकडे कोणत्याही शासनाला गत्यंतरच राहिले नव्हते.

समाजवादी साम्राज्याचा पाडाव, नेहरू-व्यवस्थेचा निःपात आणि आंतरराष्ट्रीय व्यापार खुला करणारा डंकेल प्रस्ताव या सर्व घटना शेतकरी संघटनेच्या दृष्टीने आनंदाच्या आणि भाग्याच्या; 'बळीराज्य येतसे आता, आनंदवन भुवनी' अशी घोषणा करून चतुरंग-शेतीअस्त्रांनी शेतकऱ्यांना सन्मानाने आणि सुखाने जगण्याचा अधिकार हाती घेण्याची संधी. 'सरकार समस्या सोडवत नाही, सरकार हीच समस्या आहे' ही संघटनेची सनातन भूमिका.

या आर्थिक प्रश्नांवर जनता दलाची मते संघटनेच्या बरोबर विरुद्ध टोकाची. नोकरदार, पुढारी आणि लायसन्स परमिट राज्याचे लाभधारक यांनी नव्या धोरणाला विरोध करण्यासाठी मोर्चे बांधले. त्याला डाव्यांपासून उजव्यांपर्यंत सर्व पक्षांनी पाठिंबा दिला. आर्थिक सुधारणा आणि डंकेल प्रस्ताव या प्रश्नांवरील सार्वजनिक चर्चेत हे स्पष्ट झाले की, शेतकरी संघटनेच्या विचाराचे सर्वांत अग्रणी विरोधक जनता दलातच आहेत. एक मुद्दा असा राहिला नाही की ज्यावर जनता दल आणि शेतकरी संघटना यांत काही समान सूत्र सापडावे.

चार राज्यांतील पोट निवडणुका झाल्या, जातीयवाद्यांची पीछेहाट झाली, धार्मिक कठमुल्लांना तोंड देण्यासाठी बिगर काँग्रेसी पर्याय म्हणूनदेखील जनता दलाचे महत्त्व राहिले नाही.

ऑक्टोबर ९३ मध्ये भरलेल्या औरंगाबाद अधिवेशनात खुल्या अर्थव्यवस्थेसाठी प्रखर संघर्ष करण्याचा निर्णय संघटनेने घेतला. १९८० सालाप्रमाणे एका बाजूला शेतकरी संघटना आणि दुसऱ्या बाजूला सर्व इंडियावाले असे चित्र उभे राहिले. औरंगाबादच्या अधिवेशनात शेतकरी आंदोलनाची नवी मोर्चेबंदी ठरविण्यात आली. राजकीय रणनीती ठरविण्याकरिता एका समितीची नेमणूक करण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल, महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सरोज काशीकर आणि विधान सभेचे उपाध्यक्ष, कापूस आंदोलनाचे सेनापती आमदार श्री. मोरेश्वर टेमुर्डे हे या समितीचे सदस्य आहेत. ३० डिसेंबर १९९३ रोजी जनता दलापासून वेगळे होण्याचा निर्णय हा राजकीय समितीचा पहिला निर्णय आहे. या निर्णयाबद्दल समितीचे अभिनंदन केले पाहिजे.

शेतकरी संघटनेवर कोणत्याही राजकीय पक्षाची नाममात्रही सावली नाही. शेतकरी संघटना ही खुल्या अर्थव्यवस्थेकरता झगडणारी, एकाकी खरी, पण सामर्थ्यशाली संघटना आहे. या निर्णयाने संघटनेच्या राजकीय धोरणाच्या पाटीवरील मागची सगळी गिचमीड पुसून टाकली गेली आहे आणि आता नव्याने सुरूवात करायची आहे.

जवळ जवळ सगळेच पक्ष खुल्या व्यवस्थेचा विरोध करणारे, सारेच इंडियावादी, सारेच चोर. संघटनेच्या भविष्यातील राजकीय धोरणाची उद्दिष्टे वेगवेगळी असू शकतात. काही नाही तरी निदान, कोणताही एक पक्ष बलदंड बहुमताने सत्तेवर येणार नाही अशी काळजी घेणे शेतकऱ्यांच्या हिताचे आहे. शेतकरी कार्यकर्ते आता राजकीय पक्षांना उबगले आहेत. कोणाही पक्षाकरिता धावाधाव करण्याची त्यांची इच्छा नाही हे औरंगाबाद अधिवेशनात अनेक वक्त्यांनी स्पष्ट केले आहे. खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारे काही समविचारी लोक आणि संघटना एकत्र आणण्याचा प्रयत्न झाला. त्यातून निष्पन्न एवढेच झाले की देशातील कारखानदार आणि व्यापारी मंडळी खुली अर्थव्यवस्था यावी अशा बुद्धीचे नाहीत. सरकारी संरक्षणाखाली बंदिस्त बाजारपेठेवर हात मारायला मिळत राहावा ही त्यांची इच्छा आहे. खुल्या अर्थव्यवस्थेच्या लढाईला शेतकऱ्यांना एकाकी पुढे जावे लागेल. त्यात काही सज्जन विचारवंतांचा त्यांना काय पाठिंबा मिळेल तेवढाच.

एवढ्या ताकदीवर पाच-पन्नास जागा लढवून काही साध्य होईल असे दिसत नाही. मतदार मतं देतांना एखादा पक्ष सत्तेवर येण्याची कितपत शक्यता आहे याचा अंदाज घेतो. सत्तेवर येण्याची लवमात्र शक्यता नसलेल्या पक्षाला त्याचे कार्यकर्तेसुद्धा मत टाकत नाहीत. निवडणुकीच्या आखाड्यात उतरायचे असेल तर पूर्ण तयारीने निकाली सामन्यासाठी उतरावे लागेल. १९८२ सालापासूनचे, सटाणा अधिवेशनात शिक्कामोर्तब झालेले शेतकरी संघटनेचे राजकीय धोरण दुरूस्त करून, आवश्यक तर संपूर्णपणे बदलून नवीन पर्यायी धोरणाचा विचार करावा लागेल. खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारा असा राजकीय मंच शोधावा लागेल, तयार करावा लागेल. जातीयवाद, धर्मवाद, भ्रष्टाचार, गुंडशाही, नोकरशाही यांच्याबद्दल जनतेत प्रचंड असंतोष आहे. या महाराक्षसांपासून सुटका करून घ्यायची असेल तर शासनाच्या सर्वंकष मगरमिठीतून सुटून खुल्या सामाजिक-आर्थिक-राजकीय व्यवस्थेची प्रतिष्ठाना करणे आवश्यक आहे हे गावोगावी, शहरांशहरांत घरोघरी जाऊन लोकांपुढे मांडावे लागेल आणि निदान महाराष्ट्रातील तरी प्रत्येक जागा लढविण्याची सर्व तयारी करावी लागेल.

औरंगाबादचा 'करा किंवा मरा' ठराव प्राणपणाने अंमलात आणत असतांना ही राजकीय आखणी करावी लागेल. राजकीय समितीसमोर निर्णयाकरिता उभा असलेला प्रश्न मोठा जटील आहे. त्यांचा निर्णय शेतकरी आंदोलनासाठीच नाही तर माणसाच्या स्वतंत्र होण्याच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरेल.

**सटाणा अधिवेशन –**

## राजकारणविषयक ठराव

शेतकरी संघटना ही निवडणुकीच्या राजकारणापासून दूर राहिलेली आहे. संघटनेला शेतकऱ्यांमध्ये जो प्रचंड पाठिंबा आहे, तिचा निवडणुकीवर परिणाम होत नाही याचा गैरफायदा राजकीय पक्ष उठवू पाहत आहेत. शेतकरी आंदोलनाची ताकद वाढविण्यासाठी शेतकरी संघटनेचे निवडणुकांविषयींचे धोरण ठरविण्याचे अधिकार संघटनेचे कार्यकर्ते श्री. शरद जोशी, श्री. माधवराव खंडेराव मोरे व श्री. प्रल्हाद कराड पाटील यांना देण्यात येत आहेत.


# शिवार लिमिटेड

रजिस्टर्ड कार्यालय : 'कमलप्रभा', धंतोली, नागपूर ४४० ०१२.

## शेअर्ससंबंधी वाढीव सूचना

शिवार लिमिटेडच्या प्रमोटर्स शेअर्सकरिता शेतकरी संघटनेच्या औरंगाबाद अधिवेशनात काही रक्कम भरून आगाऊ नोंदणी करणाऱ्या शेतकरी स्त्री-पुरुषांपैकी काहींनी उरलेल्या रकमेची पूर्तता करण्याची मुदत वाढवून मिळेत का अशी विचारणा केली. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन कंपनीने ही मुदत ३१ जानेवारी १९९४ पर्यंत वाढविली आहे.

तरी आगाऊ नोंदणी केलेल्या इच्छुक भागधारकांनी उरलेली रक्कम 'शिवार ॲग्रो प्रॉडक्टस् लिमिटेड' या नांवाने बँकेचा डिमांड ड्राफ्ट काढून तो ३१ जानेवारी ९४ च्या आत **शिवार ॲग्रो प्रॉडक्टस् लिमिटेड' 'कमलप्रभा', धंतोली, नागपूर - ४४० ०१२** या पत्त्यावर पाठवावी.

नोंदणी न केलेल्यांनाही ३१ जानेवारी १९९४ पर्यंत प्रत्येकी १० रु. च्या १०० शेअर्सची एकूण रक्कम रु. १०००/- किंवा त्या पटीत रक्कम डिमांड ड्राफ्टने पाठवून प्रमोटर्स शेअर्स विकत घेता येतील.

**वसंतराव बोंडे**
प्रमोटर्सकरिता

# सुधारांच्या योजनांत शेतकऱ्यांना गृहीत धरून वगळू नका

**(शरद जोशींचे पंतप्रधानांना पत्र)**

अंगारमळा,
आंबेठाण ४१० ५०१.

१९ डिसेंबर १९९३

**माननीय प्रधानमंत्रीजी,**

उरूग्वे वाटावाघाटींच्या शेवटच्या फेरीची यशस्वी सांगता होऊन जिनेव्हामध्ये १५ डिसेंबर १९९३ रोजी आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक 'गॅट' करारावर इतर राष्ट्रांबरोबर हिंदुस्थाननेही सही केली याबद्दल अभिनंदन. बहुराष्ट्रीय करार कोण्याएका राष्ट्राच्या सर्व इच्छाआकांक्षा पुऱ्या करणारा असेल अशी अपेक्षाच ठेवता येणार नाही. या करारांत हिंदुस्थानच्या अनेक अपेक्षा पुऱ्या झाल्या नाहीत हे खरे. उदा. विकसित देशांत शेतीक्षेत्राला दिली जाणारी अनुदाने रद्द करण्याच्या दृष्टीने वेगाने पावले उचलली जावीत, आयातविषयक निर्बंध कमी व्हावेत. तरीही शेतीमालाच्या व्यापारातील शासकीय हस्तक्षेपाच्या पद्धती टाकून देऊन जग वेगळ्या वाटेने चालू लागले आहे ही एक समाधानाची बाब आहे.

बुद्धिसंपदेच्या हक्कांची चोरी करण्यात स्वारस्य असलेल्या शक्तींनी, प्रामुख्याने औषधउत्पादकांच्या कंपूने डंकेल प्रस्तावाच्या विरोधात मोठा प्रचार चालवला. व्यक्तिशः मी आणि माझे शेतकरी संघटनेतील सहकारी तसेच देशपातळीवर माझे किसान समन्वय समितीतील सहकारी यांनी त्यांच्या या प्रचार-आघाडीला, अक्षरशः एकाकी तोंड देऊन त्या प्रस्तावाचे समर्थन केले. बव्हंशी हास्यास्पद आणि बऱ्याचशा बाष्कळ स्वरूपात चाललेल्या या डंकेलविरोधी प्रचाराला अतिउजव्यांपासून कट्टर डाव्यांपर्यंत सर्वच विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला. दुर्दैवाने, सरकारमधीलही कोणी या विषयासंबंधी प्रश्नांचा अभ्यास करण्याचे कष्ट घेतले नाहीत; परिणामी, सरकारच्या जबाबदार प्रवक्त्यांनी डंकेल प्रस्तावासंबंधी केलेल्या विधानांनी प्रस्तावासंबंधीच्या संभ्रमात आणखी भर घातली आणि शासनाला संसदेत मोठ्या अवघड परिस्थितीला सामोरे जावे लागले.

डंकेल प्रस्तावावरील वाटाघाटींमुळे एक गोष्ट निर्विवाद सिद्ध झाली, की हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची सबसिडी ही उणे (ऋणात्मक) आहे. (दुसऱ्या शब्दांत शेतकऱ्यांना सबसिडी नसून त्यांच्यावर कर लादला जातो.) वाणिज्य मंत्रालयाने या कराचा हिशोब 'गॅट'समोर मांडताना काही विशिष्ट आकडेमोड शिताफीने टाळली आहे, पण त्या मंत्रालयाने पुरविलेल्या माहितीवरून हे स्पष्ट आहे की, विविध उत्पादन – विशिष्ट सबसिडींची सरासरी उणे ४७% आहे. खतांवरची विभागवार सबसिडीसुद्धा उणेच आहे. सर्व जगात जास्तीत जास्त सुरक्षित कारखानदारी आणि त्याचवेळी जास्तीत जास्त दुर्लक्षित शेती अशी स्थिती हिंदुस्थानात तयार होण्यास शासनाची स्वातंत्र्योत्तर काळातील धोरणे कारणीभूत आहेत हे आता सिद्ध झाले आहे. शेतकरी आंदोलनाने १९८० सालापासून हा मुद्दा सातत्याने पुढे मांडला आहे; आता शासनानेही तो मान्य केला आहे.

'गॅट' कराराच्या अनुषंगाने येणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी उपाययोजना सुरू करणे शासनास भाग पडणार आहे. 'गॅट' कराराचा फायदा उठवण्याची क्षमता प्रामुख्याने शेतीमालातच आहे हे लक्षात घेता, या उपाययोजना शेतकऱ्यांवरील उणे सबसिडीचा अवजड बोजा हटविणे, तसेच आंतरराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिती सुधारणे यासाठी सहाय्यभूत होतील.

या दृष्टीने काही समस्यांकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो.

★ शेतीसंबंधित बऱ्याच उद्योगांना परवान्यांपासून सुटका मिळालेली नाही. उदा. मद्यार्कनिर्मिती, कापूस जीनिंग, भात गिरणी, दूधप्रक्रिया, साखर, खतनिर्मिती. आर्थिक सुधारांच्या तुटपुंज्या अंमलबजावणीमुळे अर्थव्यवस्था खुली झाली असतांनाही शेतीसंबंधी काही महत्त्वाच्या विभागांत अजूनही मक्तेदारी (एकाधिकार) सुरूच आहे.

★ शेतीमाल निर्यात अजूनही निर्यातबंदी, कोटा, निर्बंध, कॅनलायझेशन, किमान निर्यात किंमत इत्यादींच्या जंजाळात गुरफटलेली आहे. अत्यंत दुष्ट पद्धतींनी हे निर्बंध लादण्याची प्रवृत्ती शासनाने घोषित केलेल्या धोरणविषयक इच्छेशी त्याचबरोबर 'गॅट' करारातील अटींशी विसंगत आहे. उदा. कापूस.

★ शेतीमालाच्या देशांतर्गत व्यापारावरील जुन्या व्यवस्थेतील बरेच निर्बंध चालूच आहेत. उदा. भातावरील लेव्ही, झोनबंदी, कृषिउत्पन्न बाजार समित्यांची मक्तेदारी, कापूस खरेदीचा एकाधिकार, सहकारी संस्थांची मक्तेदारी.

★ आयात माल बाजारात कमी किंमतीत विकण्याच्या (dumping) शासनाच्या योजना चालूच आहे. उदा. गव्हाची आयात, दूध महापूर योजना.

★ सबसिडीचा लाभ मिळणाऱ्या खतकारखाने, वीजमंडळे इत्यादींच्या कारभारामध्ये काही सुधारणा न झाल्याने सबसिडी कमी करण्याच्या सर्व योजनांचा, बोजा, आर्थिक उदारीकरणाच्या सर्व योजनांमधून वगळल्या गेलेल्या शेतीलाच सोसावा लागला.

★ आर्थिक उदारीकरणाच्या उपाययोजना अगदी फुटकळ स्वरूपात पुढे आल्या आणि त्यासुद्धा जुन्या संपलेल्या व्यवस्थेच्या कायदेकानूनांच्या जंगलात कुणाच्या ध्यानात येण्याआधीच लोप पावल्या. प्रथमतः, परवाना आणि निर्यात यांच्या कार्यपद्धतींतील दुर्बोधता नष्ट केली पाहिजे. त्यासाठी, पूर्णपणे निर्बंधरहित परिस्थिती निर्माण करून पहिल्यापासून सुरुवात करणे आणि नंतर, प्रसंगोपात आवश्यकता भासल्यास काही निर्बंध घालणे हा एकमेव खात्रीचा मार्ग आहे.

या समस्यांवरील उपाययोजनांच्या बरोबरीनेच आर्थिक सुधाराचा कार्यक्रम राबवितांना शासनाने जर पुढील मुद्देही ध्यानात घेतले तर शेतकऱ्यांच्या दृष्टीने ते महत्त्वाचे ठरतील.

आजपर्यंतच्या आर्थिक सुधारांच्या योजनांना आजपर्यंत मिळालेले यश हा पुष्कळसा नशिबाचा भाग आहे. यापुढे अधिक ठोस आणि निश्चयी कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. आर्थिक सुधारांच्या आतापर्यंतच्या उपाययोजना सरकारच्या सुधारकार्यक्रमांसंबंधी पुरेसा विश्वास निर्माण करू शकलेल्या नाहीत. व्यवसाय समाप्ती (Exit Policy) सरकारी कर्माचाऱ्यांचे पगारभत्ते व नोकरशाहीचे साम्राज्य, राष्ट्रीय कृषिनिती आणि डंकेल प्रस्ताव याबाबत शासनाची द्विधा मनःस्थिती आणि दुतोंडी भाषा हे यामागचे एक प्रमुख कारण आहे.

शासनाच्या आर्थिक सुधारांच्या अंमलबजावणीच्या निर्धाराविषयी जनतेत विश्वास निर्माण होण्यासाठी जुन्या व्यवस्थेतील संस्था, व्यवस्था आणि नोकरवर्ग यांमध्ये आवश्यकतेप्रमाणे बदल करणे व त्यांना पर्याय तयार करणे किंवा त्या मोडून टाकणे महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ,

★★घटनाबाह्य अशा नियोजन मंडळाबाबत फेरविचार करणे आवश्यक आहे.

★★सहकारी संस्थांना दिली जाणारी पक्षपाती अनुदाने व सवलती एकतर बंद करायला हवीत किंवा दहापेक्षा अधिक शेतकरी-कामगारांनी उभ्या केलेल्या इतर कोणत्याही स्वरूपातील व्यावसायिक संस्थांनाही ती मिळण्याची व्यवस्था केली पाहिजे.

★★घटनेतील नववे परिशिष्ठ आणि कलम ३१ मध्ये केलेल्या सर्व दुरुस्त्या रद्द करून खुल्या बाजारपेठेच्या तत्त्वाचा अविभाज्य भाग म्हणून मालमत्ता मालकी हक्काची मूलभूत हक्क म्हणून पुनर्प्रस्थापना करणे आवश्यक आहे.

★★वित्तीय तूट तसेच वीज, खते, सार्वजनिक वितरण व्यवस्था, रेल्वे, टपालखाते यांसाठी दिली जाणारी अनुदाने आणि राज्यशासनांना दिली जाणारी अनुदाने यांत मोठ्या प्रमाणावर कपात केली पाहिजे. यासाठी नोकरदारांची संख्या तसेच त्यांचे पगारभत्ते आणि अवांतर उत्पन्न यांत कपात करणे यासारख्या काटकसरीच्या योजना राबविल्या पाहिजेत. सरकारी नोकरी म्हणजे आजकाल स्वर्गसुखाची बाब बनली आहे. आकर्षक पगारभत्ते, एखाद्यावर मेहेरनजर करण्याची किंवा त्याला जेरीस आणण्याची मनमुराद शक्यता, अत्यल्प जबाबदारी आणि अवांतर उत्पन्नाच्या संधीच संधी! समाजातील सर्वच उत्पादक घटकांच्या दृष्टीने नोकरशाही हा आता असह्य बोजा झाला आहे. परदेशी बाजारपेठेतील स्पर्धेमध्ये भारतीय माल आणि सेवा यांचे भवितव्य नोकरशाहीच्या मर्जीवर अवलंबून असते. सरकारी नोकरी तुलनेने अनाकर्षक केली पाहिजे, तसेच स्वार्थासाठी अडवणूक करण्याची तिच्यातील शक्ती नष्ट केली पाहिजे. सरकारी नोकरांचे दरडोई पगारभत्ते (१०७१-७२ = १०० च्या तुलनेत सध्या ७३१) हे राहणीमानाच्या खर्चाच्या निर्देशांका (१९७१-७२ = १०० च्या तुलनेत सध्या ३८४) च्या पातळीला येईपर्यंत महागाई भत्ते देणे बंद करणे.

शासन अनेक आर्थिक जबाबदाऱ्या सोडत असतांना कर्जपरत फेडीच्या कामाखेरीज नव्या कर योजनांतून त्याचे उत्पन्न वाढवण्याचे सर्व प्रस्ताव निरर्थक आहेत.

वर्धितमूल्य कर शेतीक्षेत्रावर लागू करू नयेत कारण वर्धितमूल्य ही संकल्पना या क्षेत्रात लागू करणे अत्यंत कठीण काम आहे.

खुल्या बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेचे शेतकरी हे स्वाभाविक साथी आहेत कारण त्यांचा फायदा उत्पादनातून मिळतो, विनिमयातून नव्हे हे मी मोठ्या आग्रहाने आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो; त्यांचे सहकार्य गृहीत धरून आर्थिक सुधार कार्यक्रमांच्या अंमलबजावणीतून त्यांना वगळले जाणार नाही, अशी आशा बाळगतो.

सादर.

आपला,

**शरद जोशी**

*(मूळ इंग्रजी पत्राचे मराठीकरण)*

# ‘गुजरात खेडूत समाज’ चे आंदोलन २६ जानेवारी १९९४

बडोदा येथे १३ ऑक्टोबर १९९३ रोजी झालेल्या प्रचंड किसान मेळाव्यात, शासनाने येत्या प्रजासत्ताक दिनाच्याआधी खुल्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भातील शेतकऱ्यांच्या मागण्या पुऱ्या करण्याच्या दिशेने काही पावले उचलावयास सुरुवात केली नाही तर गुजरातमधील शेतकरी आपण कर्जमुक्त झाल्याचे जाहिर करतील व गुजरातमधून इतर राज्यांत जाणारा खनिजवायू रोखण्याचे आंदोलन करतील असा इशारा दिला होता.

शासन हलण्याची काही लक्षणे दिसत नाहीत. गुजरात खेडूत समाजाच्या वतीने गुजरातच्या शेतकऱ्यांचे हे आंदोलन २६ जानेवारी १९९४ रोजी अंकलेश्वर जवळील ‘झगडीया’ या गावी सुरू होत आहे.

‘शेतकरी तितुका एक एक’ या घोषणेतील सत्यार्थ जगाला दाखविण्यासाठी महाराष्ट्रातील शेतकरी स्त्री-पुरुष या आंदोलनात सहभागी होण्यासाठी येत आहेत असा शब्द शेतकरी संघटनेने गुजरात खेडूत समाजाला दिला आहे. गुजरात खेडूत समाजाने पन्नास ते साठ हजार महराष्ट्रीय शेतकऱ्यांच्या स्वागताची तयारी केली असून इतक्या मोठ्या संख्येने महाराष्ट्रातील शेतकरी येत आहेत हे ऐकून गुजरातमधील शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे उधाण आले आहे.

### खनिजवायूसंबंधी भूमिका

विजेचे दर कमी करावेत ही गुजरातमधील शेतकऱ्यांची बऱ्याच दिवसांची मागणी आहे. पण, शासन त्या मागणीला वाटे लावण्यासाठी, गुजरातमध्ये वीजनिर्मितीसाठी लागणारा कोळसा बिहारमधून आणावा लागतो म्हणून वीज महागच राहाणार असा दावा करते. पण गुजरातमध्ये खनिजवायू विपूल प्रमाणात उपलब्ध आहे, त्यातील बराचसा वाया जातो. सध्या हा वायू गुजरातेतून उत्तर प्रदेशात मोठ्या पाईपलाईनद्वारे अमेठीला औद्योगिक कारणासाठी नेण्याची योजना चालू आहे. गुजरातमधील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की बिहारमधील कोळशाऐवजी हा वायू राज्यातल्या राज्यात वापरून वीजनिर्मिती करावी म्हणजे विजेचा उत्पादनखर्च कमी होईल व ती स्वस्त करता येईल. म्हणून ‘खनिज वायू रोको’ चे हे आंदोलन उभे करण्यात येत आहे.

# भारत आणखी ‘गरीब’ झाला

वॉशिंग्टन, ता. ३० (यूएनआय) भारताचे दरडोई वार्षिक उत्पन्न १९९२ मध्ये वीस डॉलरनी घटले. त्यामुळे दरडोई साडेसातशे डॉलरपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या ५७ कमी उत्पन्न देशांच्या गटात भारताची आता भर पडली आहे.

भारताचे डरडोई एकूण राष्ट्रीय उत्पन्न १९९१ मध्ये ३३० डॉलर, तर १९९२ मध्ये ३१० डॉलर होते, असे जागतिक बँकेने म्हटले आहे. भारताचा वाढीचा दर १९८५ ते १९९२ या काळात ३.३ टक्के राहिला आहे. याच काळात लोकसंख्यावाढीचा दर २.१ टक्के होता.

जगातील दहा सर्वांत गरीब देशांपैकी आठ आफ्रिकेत आहेत. मोझांबिक सर्वांत गरीब आहे. त्या देशाचे १९९२ मधील एकूण राष्ट्रीय उत्पन्न ६० डॉलर होते. १९९१ मध्ये त्या देशाचे दरडोई उत्पन्न ८० डॉलर होते. इथिओपिया आणि टांझानिया या यादीत दुसरे असून, या दोन्ही देशांचे दरडोई उत्पन्न ११० डॉलर आहे. त्या पाठोपाठ सिएर लिओन, युगांडा व नेपाळ (प्रत्येकी १७० डॉलर), भूतान (१८० डॉलर), गिनिआ बिसाऊ, मलावी व बुरुंडी (प्रत्येकी २१० डॉलर) यांचा क्रमांक लागतो. बांगलादेशाचा क्रमांक अकरावा आहे.

स्वित्झर्लंड जगात सर्वांत श्रीमंत देश आहे. त्या देशाचे दरडोई राष्ट्रीय उत्पन्न ३६ हजार ३६० डॉलर आहे. लक्झेंबर्गचा क्रमांक दुसरा आहे, तर अमेरिकेचा सातवा. या यादीत जपान हा एकमेव आशियाई देश आहे. तो तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्याखेरीज स्वीडन, डेन्मार्क, नॉर्वे, आइसलंड, जर्मनी व फिनलंड हे पहिल्या दहा क्रमांकात आहेत.

जगभर विसाव्या शतकात तंत्रज्ञानाचा चमत्कार घडत असताना, जगातील एक पंचमांशपेक्षा जास्त लोकांचे उत्पन्न दिवसाला एका डॉलरपेक्षा कमी आहे, हेही बँकेने निदर्शनास आणून दिले आहे.

(सकाळ ३१ डिसेंबर १९९३)

### हे आहे नेहरू व्यवस्थेचे प्रगती पुस्तक

एक काळ असा होता की त्यावेळी या देशात सोन्याचा धूर निघत होता असे म्हणतात. आजच्या या अवस्थेला नियोजनावर भर देणारी नेहरूव्यवस्थाच कारणीभूत आहे. योगायोगाने या व्यवस्थेच्या मगरमिठीतून सुटण्याची संधी देशाची आजची आर्थिक स्थिती व ‘गॅट’ करार यामुळे लाभत आहे.

पण हीच व्यवस्था पुढे चालू राहावी म्हणून या व्यवस्थेवर पोसलेली बांडगुळे मोठा आटोकाट प्रयत्न करीत आहेत. पण आता ‘गॅट’ कराराच्या अंमलाखाली ही व्यवस्था पुनरूज्जीवित होणे असंभव आहे.

नवी येणारी व्यवस्था आणखी व्यंगात्मक होऊ नये याची काळजी आता खुल्या व्यवस्थेचे खरे साथी शेतकरी आणि उद्योजक यांनीच घेतली पाहिजे. त्यासाठी चर्चा नव्हे तर कृती आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने त्यासाठी, शेगाव मेळाव्यात स्वीकारलेल्या चतुरंग शेतीच्या कार्यक्रमाला पर्याय नाही.

नेहरू व्यवस्थेने घालविलेली देशाची शान आत शेतकरीच पुन्हा आणतील हे सर्वमान्य झाले आहे. आता शेतकऱ्यांनी स्वस्थ बसून चालणार नाही. शेती हा व्यवसाय स्वतःच्या मताने करण्यात आड येणारे सर्व निर्बंध झुगारून, प्रसंगी संघर्ष करून शेतकऱ्यांनी आता चतुरंग शेतीचा - सीताशेती, माजघर शेती, व्यापार शेती, व निर्यात शेती यांचा मार्ग टप्प्याटप्प्याने चोखाळायला सुरुवात करणे आवश्यक आहे.

नाहीतर नेहरू व्यवस्था टिकून राहाण्यासाठी कावकाव करणाऱ्यांचीच सरशी होऊन जगभरच्या खुल्या व्यापाराच्या वातावरणात एखादी विकृत व्यवस्था माथी बसून देशाची उरली सुरली शानसुद्धा निघून जाईल.

●●●

# दारू दुकान बंदी :
# मुख्यमंत्र्यांची आणखी एक घोषणा

शेतकरी महिला आघाडीने गेली चार वर्षे सातत्याने दारू दुकान बंदी आंदोलन चालविले आहे. परंतु शेतकरी महिला आघाडीने कुलूपबंद केलेली किंवा 'गावात दारूचे दुकान नको' या आशयाचे ठराव ग्रामपंचायतीत करवून घेतले त्या गावातील दारू दुकाने बंद करण्याच्या बाबतीत शासनाने काहीही पावले उचललेली नाहीत.

२३ मे १९९३ रोजी महाराष्ट्राच्या विद्यमान मुख्यमंत्र्यांनी सातारा जिल्ह्याच्या वाई तालुक्यातील सुरूर येथे 'ज्या गावातील महिला व ग्रामपंचायत दारू दुकाने बंद करण्याची मागणी करतील, तेथील दारू विक्रीची दुकाने शासन बंद करील' अशी ग्वाही दिली होती.

इतके दिवस प्रयत्न करूनही दारू दुकाने पोलिस संरक्षणाखाली सुरू होतात, तेथे दादागुंडांची प्रशिक्षण केंद्रे चालूच राहातात याने निराश झालेल्या शेतकरी महिला आघाडीने मुख्यमंत्र्यांनी सुरूर येथे दिलेली ग्वाही 'भल्या माणसाचा शब्द' मानला आणि पुन्हा जोमाने आपले दारू दुकान बंदी आंदोलन सुरू केले. जिल्ह्याजिल्ह्यातील शंभरावर ग्रामपंचायतींनी किंवा ग्रामसभांनी 'आमच्या गावातील दारूचे दुकान बंद करावे' या आशयाचे ठराव संमत केले व शासनाकडे पाठविले. पण पहिले पाढे पंचावन्न. शासन दुकाने बंद करील अशी काही लक्षणे दिसत नाहीत.

शेतकरी महिला आघाडीच्या औरंगाबाद येथे ३१ ऑक्टोबर १९९३ रोजी झालेल्या अधिवेशनात ठराव झालेली दुकाने बंद करण्याच्या दिशेने शासनाने काही पावले उचलली नाहीत तर २६ जानेवारी १९९४ पासून तीव्र आंदोलन उभे करण्याचा इशारा शासनाला देण्यात आला.

अजून काही हालचाल दिसत नाही म्हणून शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा आमदार सौ. सरोज काशीकर, आमदार वसंतराव बोंडे, आमदार शिवराज तोंडचिरकर या विधानसभेतील शेतकरी संघटनेच्या बिनीच्या कार्यकर्त्यांनी नुकत्याच नागपूर येथे पार पडलेल्या विधानसभेच्या अधिवेशनात यासंबंधी प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाचे उत्तर देतांना मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी सुरूरच्या घोषणेवर ताण करणारी घोषणा केली. सकाळ (पुणे-२९/१२/९३) या वर्तमानपत्रातील एका बातमीतील या विषयांसंबंधीचा भाग असा आहे :

**पंचायतीशी वाद झाल्यास ग्रामसभेचा निर्णय अंतिम, मुख्यमंत्र्यांची घोषणा.**

**नागपूर, ता. २८ : कोणत्याही प्रश्नामध्ये ग्रामसभा आणि ग्रामपंचायत यांच्या भूमिका वेगवेगळ्या असतील, तर त्यांत ग्रामसभेचा निर्णय अंतिम समजला जाईल, असे सुधारित परिपत्रक काढण्याची घोषणा मुख्यमंत्री शरद पवार यांनी आज विधानसभेत केली.**

प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान विचारण्यात आलेल्या, चंद्रपूर जिल्ह्यातील कोठारी गावातील देशी दारूच्या दुकानांच्या बंदी विषयावरील मूळ प्रश्नाला मुख्यमंत्री उत्तर देत होते. वसंत बोंडे, वामन चटप, शिवराज तोंडचिरकर, सरोज काशीकर यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता.

या संदर्भात एका उपप्रश्नाला उत्तर देतांना उत्पादन शुल्कमंत्री स्वरूपसिंग नाईक म्हणाले की, २७ नोव्हेंबर, ९२ रोजी कोठारीच्या ग्रामसभेने तेथील देशी दारूचे दुकान बंद करण्याचा ठराव केला, असे म्हटले असले तरी त्या सभेस उपस्थित असणाऱ्यांनी या संदर्भात कोणताच ठराव झालेला नाही, असा दावा केला. त्यानंतर १० ऑगस्ट, ९३ रोजी कोठारी ग्रामपंचायतीने चंद्रपूर जिल्ह्यात जोपर्यंत संपूर्ण दारूबंदी जाहीर होत नाही, तोपर्यंत कोठारीचे दुकान बंद करू नये, असा ठराव केला होता.

(सकाळ २९/१२/९३)

**(पान ८ पहा)**

# आदेश
# आदेश
# आदेश...

गुजरात खेडूत समाजाने आयोजित केलेला हा कार्यक्रम झगडिया या गावी होणार असून हे गाव पश्चिम रेल्वेच्या अंकलेश्वर या मोठ्या स्थानकापासून २० कि. मी. अंतरावर आहे. अंकलेश्वर हे सूरत- अहमदाबाद मार्गावर सूरतपासून ६० कि. मी. अंतरावर आहे.

ज्यांना बडोद्याकडून येणे सोयीचे आहे त्यांना भडोच येथे उतरून झगडियाला जावे लागेल. अंकलेश्वर व भडोच या दोन्ही ठिकाणी रेल्वे स्थानकांवर व लगतच्या महामार्गावर गुजरात खेडूत समाजाचे मार्गदर्शन कक्ष असतील. या दोनही ठिकाणाहून झगडिया येथे जाण्यासाठी बस गाड्यांची सोय आहे. शिवाय, गुजरात खेडूत समाजही वाहनांची व्यवस्था करणार आहे.

शेतकरी आंदोलनाच्या सैनिकांनी,

★ शेतकरी संघटनेच्या नेहमीच्या शिस्तीने प्रवास करावा,

★ आवश्यक ते साहित्य पुरेसे बरोबर घ्यावे.

★ महिलांची संख्या पुरुषांच्या संख्येहून करमी नसावी.

★ आपल्या सोबत शेतकरी संघटनेने पुरस्कार केलेल्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या घोषणांचे शक्यतो हिंदीतील फलक ठेवावेत.

★ वाटेत गणवेषातील किंवा गणवेषाशिवाय असलेल्या गुडांच्या त्रासापासून आंदोलक सैनिकांचे संरक्षण करण्यासाठी गावातील 'नाना पाटील ब्रिगेड'च्या सैनिकांना सोबत घ्यावे.

ज्या गावी दारूची दुकाने आहेत त्या गावातील शेतकरी स्त्री पुरुषांनी ग्रामसभेत दारूदुकानबंदीचा ठराव करण्याच्या कार्यक्रमासाठी गावीच राहावे, त्यांनी गुजरातच्या आंदोलनात सध्या येऊ नये. त्यांना पुढील टप्प्यात जाता येईल.

**पाशा पटेल,**
अध्यक्ष,
शेतकरी संघटना

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 7th January, 1994

**To**

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
January 6, 1994

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

शेतकरी महिला आघाडी

## दारू दुकानबंदी आंदोलन
## २६ जानेवारी १९९४.

**भावांनो आणि मायबहिणींनो,**

औरंगाबाद येथे झालेल्या शेतकरी महिला आघाडीच्या अधिवेशनातील (३१/१०/९३) ठराव क्र. ३ नुसार, शासनाने ग्रामपंचायतींचे ठराव झालेली दारू दुकाने बंद करण्याविषयी काही कारवाई सुरू न केल्यास २६ जानेवारीपासून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी २८ डिसेंबर १९९३ रोजी विधानसभेत ग्रामसभा व ग्रामपंचायत यांच्या अधिकारांबाबत एक घोषणा करून जणू मुदत मागून घेतली आहे.

या आंदोलनाचा भाग म्हणून २६ जानेवारी १९९४ रोजी भरणाऱ्या ग्रामसभेमध्ये शेतकरी महिला आघाडी दारू दुकानबंदीचा ठराव संमत करून घेणार आहे त्यासाठी,

१) दारू दुकानबंदीचा ठराव मांडणार असल्याची पूर्वसूचना आपल्या सरपंचांना लवकरात लवकर द्यावी.

२) या ग्रामसभेला गावातील सर्व महिला, शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते व गावातील सज्जन पुरुष हजर राहावेत यासाठी जोरदार प्रचार करावा.

३) दारू दुकाने म्हणजे दादागुंडांचे अड्डे तेच बंद करण्याचा हा कार्यक्रम. त्यामुळे त्यांच्याकडून ग्रामसभेच्या आधीच दहशत बसविण्याचा प्रयत्न केला जाईल. पूर्वतयारी म्हणून महिला आघाडीने गावच्या पोलिस पाटलास व विशेषतः गावातील 'नाना पाटील ब्रिगेड' ला या बाबतीत जागरूक राहाण्याची विनंती करावी.

४) प्रजासत्ताक दिनाच्या ग्रामसभेत दारू दुकानबंदीसंबंधी आपले विचार निर्भिडपणे मांडावेत व दारू दुकानबंदीच्या बाजूने आपले मत नोंदवावे.

५) १०० टक्के महिला व सज्जन पुरुषांची हजेरी म्हणजे ठरावाला यशस्वी मान्यता यावर विश्वास ठेवून २६ जानेवारी पर्यंत या कार्यक्रमाचा प्रचार करावा.

आपली,
**सौ. सरोज काशीकर,**
अध्यक्षा, शेतकरी महिला आघाडी

(पान ७ वरून)

या घोषणेनुसार तरी मुख्यमंत्री परिपत्रक काढतील आणि या परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी होते आहे हे पाहण्याची व्यवस्था करतील या आशेने शेतकरी महिला आघाडीने २६ जानेवारी १९९४ रोजी, दरवर्षी प्रजासत्ताक दिनी भरते तशी जी ग्रामसभा भरेल त्या ग्रामसभेत दारू दुकानबंदीचा ठराव मांडून संमत करून घेण्याचे ठरविले आहे. ज्या ज्या गावात दारूदुकाने आहेत निदान त्या त्या गावातील सर्व महिलांनी २६ जानेवारी १९९४ रोजी आपल्या गावात भरणाऱ्या ग्रामसभेस न चुकता हजर राहावे व 'दारू दुकान बंदी'चा ठराव संमत करून तो ग्रामपंचायतीमार्फत शासनाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी असे आवाहन शेतकरी महिला आघाडीने केले आहे. गावातील महिलांनी आपण असा ठराव या ग्रामसभेत मांडणार असल्याची पूर्वसूचना लेखी स्वरूपात, लवकरात लवकर सरपंचांकडे द्यावी, तसेच या ठरावाला पाठिंबा देण्यासाठी पुरुषांनी मोठ्या संख्येने हजर ठेवण्याचे प्रयत्न करावे.

'भल्या माणसाचा शब्द' ही आशा यावेळीही फोल ठरली तर या विषयावर तीव्र आंदोलन उभे करण्याचा निर्धार शेतकरी महिला आघाडीने केला असून त्याविषयी सविस्तर चर्चा ६ जानेवारी १९९४ रोजी येवला येथे होणाऱ्या शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकारिणीच्या बैठकीत होणार आहे.

**कौन बढाये देश की शान**
**भारत का आजाद किसान ।**

**सरकार समस्या क्या सुलझाये**
**सरकार यही समस्या है ।**

**किसान एकता झिंदाबाद ।**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण २३५४, २४६८**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**